आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२७ ऑगस्ट २०२६ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नेपाळमध्ये अचानक आलेल्या महापुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १७० वर, हजारो बेपत्ता/ भारताकडून दुसऱ्या मदत फेरीतून सुमारे साडेसदतीस टन मदत सामग्री रवाना

- नेपाळमधे अडकलेल्या राज्यातल्या पर्यटकांचा शोध घेण्यात येत असून हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध

- देशात क्रीडा विद्यापीठांपासून ते आधुनिक प्रशिक्षण केंद्रांपर्यंत व्यापक क्रीडा परिसंस्था विकसित केली जातबईत १ सप्टेंबरपासून रिक्षा भाडे १ रुपयानं, तर टॅक्सी २ रुपयांनी महागणार असल्याचं प्रधानमंत्र्यांचं खेलो इंडिया संवादात प्रतिपादन

- राज्याच्या किनारपट्टी भागात आज नारळी पौर्णिमेच्या सणाचा उत्साह

**आणि**

- भारत - श्रीलंका दुसरा कसोटी क्रिकेट सामना अनिर्णिततेकडे झुकला

**<><><><><>**

नेपाळमध्ये अचानक आलेल्या महापुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १७७ वर पोहोचली आहे. आणखी हजारो बेपत्ता असून त्यात सुमारे तीनशे भारतीय पर्यटकांसह इतर परदेशी नागरिकांचा समावेश असल्याची माहिती नेपाळचे परराष्ट्र मंत्री शिशिर खनाल यांनी आज दिली.

महापुराच्या पार्श्वभूमीवर भारतानं सुमारे साडे सदतीस टन मदत सामग्री आज नेपाळकडे रवाना केली. काल १० टन बचाव साहित्य आणि जीवनावश्यक औषधं तातडीनं पाठवण्यात आली होती. पूरग्रस्त भागात अडकलेल्या भारतीय नागरिकांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी तातडीचे प्रयत्न सुरु असल्याचं परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस जयशंकर यांनी सांगितलं. भारत सरकार नेपाळी अधिकाऱ्यांच्या संपर्कात असून बचावकार्याला सातत्यानं सहाय्य करेल, असं ते म्हणाले. त्यांनी आज नवी दिल्लीत उच्चस्तरीय आढावा बैठक घेतली. परराष्ट्र सचिव तसंच काठमांडू आणि बीजिंग इथले भारताचे राजदूत या बैठकीत सहभागी झाले होते.

नेपाळ आणि तिबेटमध्ये महापुरामुळे झालेल्या जीवित आणि वित्त हानीबद्दल संयुक्त राष्ट्राचे महासचिव अँटोनियो गुटेरेस यांनी दुःख व्यक्त केलं आहे. या आपत्तीत संयुक्त राष्ट्रांकडून तात्काळ मदत पाठवली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, नेपाळमधल्या पुराच्या पार्श्वभूमीवर बिहार आणि उत्तर प्रदेशात नद्यांमधे पाणी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या नऊ तुकड्या बिहार आणि उत्तर प्रदेशात तैनात करण्यात आल्या आहेत. सावधगिरीचा उपाय म्हणून काल रात्री आणि आज पहाटे बिहारच्या पश्चिम चंपारण जिल्ह्यात गंडक नदी बराजमधून पाणी सोडण्यात आलं. सुमारे पाच हजार नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं. इतर जिल्ह्यातही सावधगिरी बाळगत नागरिकांना सुरक्षित स्थळी नेण्यात आलं.

बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी सीमाभागातल्या बगाहा, वाल्मिकी नगर, बेतिहा, मोतीहारी या क्षेत्राची आज हवाई पाहणी केली. आता परिस्थिती नियंत्रणाखाली असल्याचं बिहार सरकारनं सांगितलं.

उत्तर प्रदेश सरकारनं सीमाभागातल्या महाराजगंज आणि कुशीनगर जिल्ह्यांमध्ये सतर्क राहण्याचे आदेश स्थानिक प्रशासनाला दिले असून घाबरून न जाण्याचं आवाहन नागरिकांना केलं आहे. तसंच नेपाळमध्ये अडकलेल्या नागरिकांची माहिती हेल्पलाईन वर देण्याचं आवाहनही केलं आहे.

**<><><><><>**

नेपाळमधे अडकलेल्या राज्यातल्या पर्यटकांचा शोध घेण्यासाठी राज्यशासन केंद्र सरकारच्या संपर्कात असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. ते आज नाशिक इथं वार्ताहरांशी बोलत होते. राज्यातून नेपाळ, कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेल्यांची माहिती संकलित करावी असं सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सांगितलं असून, आपत्ती व्यवस्थापन विभागानं मदत दूरध्वनी क्रमांक जारी केले आहेत. १-०-७-० हा क्रमांक मंत्रालयातल्या नियंत्रण कक्षात २४ तास कार्यरत राहील. राज्यातल्या ४५ प्रवाशांचे दोन गट बसने नेपाळला गेले असून त्यांच्याशी संपर्काचा प्रयत्न सुरु आहे, असं महाजन यांनी सांगितलं. त्याखेरीज आणखी काही पर्यटकांशी संपर्क झाला असून ते सुखरूप असल्याचं समजलं आहे.

**<><><><><>**

देशातल्या प्रतिभेला प्रत्येक टप्प्यावर पाठिंबा मिळेल अशा क्रीडा विद्यापीठांपासून ते आधुनिक प्रशिक्षण केंद्रांपर्यंत क्रीडा परिसंस्था विकसित केली जात असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. खेलो इंडिया संवाद या कार्यक्रमाला ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करत होते. खेळ हे केवळ पदक जिंकण्यापुरते मर्यादित नसून उत्तम व्यक्तिमत्त्व घडवण्याचा मार्ग असल्याचंही प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

**होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री**

फिट इंडिया मूव्हमेंट, संडे ऑन सायकल सारख्या उपक्रमांमुळे नागरिक आता सुदृढ आणि निरोगी जीवनशैलीला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे भारताची क्रीडा परिसंस्था आता पायाभूत सुविधा आणि पदकांच्या पलिकडे जात असल्याचं केंद्रीय क्रीडा आणि युवा व्यवहार मंत्री मनसुख मांडवीय म्हणाले. राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायद्यामुळे खेळात पारदर्शकता येत आहे. भारताच्या तरुणांना विकसित भारताच्या प्रवासातील सक्रिय भागीदार बनवणं हे सरकारचं उद्दिष्ट असल्याचं मांडवीय यावेळी म्हणाले.

खेलो इंडिया संवाद हा कार्यक्रम राष्ट्रीय क्रीडा दिन २०२६च्या उत्सवाचा भाग म्हणून आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या प्रत्येक जिल्ह्यातल्या दोन महाविद्यालयांमधले तरुण सहभागी झाले होते.

**<><><><><>**

कांद्याच्या वाढलेल्या दराच्या पार्श्वभूमीवर येत्या काही महिन्यात कांद्याची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आणि झालेली भाववाढ नियंत्रित ठेवण्यासाठी, केंद्र सरकारने राखीव साठ्यातून नियोजनपूर्वक आणि टप्प्याटप्प्याने कांदा बाजारात आणण्यास सुरुवात केली आहे. आगामी काळात देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी कांद्याची उपलब्धता समाधानकारक असेल, असं ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने सांगितलं आहे. राखीव साठ्यातल्या या कांद्याची विक्री राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ आणि राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ - नाफेडच्या फिरत्या गाड्या आणि किरकोळ विक्री केंद्रांमधून, तसंच सफल आणि केंद्रीय भांडारमधून ३५ रुपये प्रति किलो दराने करण्यात येईल.

**<><><><><>**

श्रावण पौर्णिमा म्हणजेच नारळी पौर्णिमेचा सण आज राज्याच्या किनारपट्टी भागात साजरा होत आहे. पावसाळ्यामुळे मासेमारी बंद करुन बंदरात नांगरलेल्या होड्या या दिवशी पुन्हा समुद्रात लोटल्या जातात. त्यामुळे किनारपट्टीवरच्या विशेषतः मच्छिमार समाजात या दिवसाला खूप महत्त्व आहे. मुंबईतल्या विविध कोळीवाड्यांमधे आज संध्याकाळी जत्रा भरतील. समुद्राला नारळ अर्पण करुन, शांत होण्याची प्रार्थना केली जाईल. रक्षाबंधनाचा सण उद्या साजरा केला जाणार आहे. मुंबईत या सणानिमित्त शहर आणि उपनगरात मिळून १३६ जादा गाड्यांची व्यवस्था बेस्ट उपक्रमाने केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नारळी पौर्णिमेनिमित्त कोळी समाजाला शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

नवी दिल्लीत नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या भारत नवीकरणीय ऊर्जा परिषद आणि प्रदर्शनात महाराष्ट्र भागीदार राज्य म्हणून भूमिका बजावेल, अशी घोषणा राज्याचे अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे यांनी केली. या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातल्या भारताच्या प्रगतीकडे जग आदराने बघत आहे आणि भारतात गुंतवणूक करायला उत्सुक आहे, अशी ग्वाही केंद्रीय नूतन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिली.

**<><><><><>**

महाराष्ट्रात अमरावती इथं रुग्णालयाला आग लागून तीन अर्भकांचा मृत्यू झाल्याच्या वृत्ताची दखल राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने स्वतःहून घेतली असून राज्याच्या मुख्य सचिवांना नोटीस जारी केली आहे. या दुर्घटनेबद्दलचा अहवाल येत्या दोन आठवड्यात सादर करायला आयोगानं सांगितलं असून, त्यात दुर्घटनेत जखमी झालेल्या बालकांची स्थिती आणि बाधित कुटुंबांना जाहीर झालेल्या अर्थसहाय्याचं वाटप याबाबतचा तपशीलही मागितला आहे.

**<><><><><>**

पिंपळवडी इथला बलात्कार प्रकरणातला खटला जलदगती न्यायालयात चालवून पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी सर्व प्रयत्न करणार असल्याचं उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितलं आहे. आज त्यांनी पीडितेची भेट घेतली. महिला आणि बाल विकास विभागाच्या 'मनोधैर्य योजने'अंतर्गत १० लाख रुपयांची मदत पीडितेच्या खात्यावर जमा

होईल. तसेच पीडित कुटुंबाच्या मागणीनुसार ‘शबरी आदिवासी घरकुल योजने’अंतर्गत घर देण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने कुटुंबाला आर्थिक मदत देण्यात आली असून, पीडितेच्या भावंडांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घेण्याचा निर्णय घेतल्याचे पवार यांनी सांगितले.

**<><><><><>**

कोलंबोत सुरु असलेल्या, भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात आज पाचव्या आणि शेवटच्या दिवशी श्रीलंकेनं दमदार फलंदाजी करत सामना अनिर्णित ठेवण्याकडे वाटचाल सुरु ठेवली आहे. कालच्या २९० धावसंख्येवरुन आज एस दिनुशा आणि के नुवांता या जोडीनं खेळ सुरु केला आणि बराच काळ धावपट्टीवर टिकाव धरत धावसंख्या ३३० वर नेली.

चहापानापर्यंत श्रीलंकेच्या ८ बाद ३८३ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

मुंबईत जवाहरलाल नेहरू बंदर हे जगातलं सर्वात वेगाने वाढणारं कंटेनर बंदर म्हणून उदयाला आलं आहे, असं केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे. यंदा पहिल्या सहा महिन्यात कंटेनर हाताळणीत १३ पूर्णांक ६ दशांश टक्के वाढ नोंदवून हे बंदर जागतिक स्तरावर एकविसाव्या स्थानावर पोहोचलं आहे, असं सोनोवाल आपल्या संदेशात म्हणाले.

**//<><><><><>//**